## कृषी विज्ञान केंद्राची ३२ वी शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक उत्साहात संपन्न...

कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांच्या शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक मा.डॉ.प्रशांतकुमार पाटील, कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली व मा. डॉ. सी. एस. पाटील , संचालक विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या उपअध्यक्षतेखाली कृविके, धुळे येथे संपन्न झाली. या बैठकीस डॉ. तुषार आठरे, शास्त्रज्ञ, अटारी, पुणे, डॉ. बी. एम. इल्हे, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे, श्री. कुरबान तडवी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे, डॉ. सुरेश दोडके, गहू पैदासकार, गहू संशोधन केंद्र, निफाड, डॉ. मिलिंद भंगे, सहायक उपायुक्त, पशुसंवर्धन, धुळे, डॉ. दिनेश नांद्रे , वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख ,कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ. हेमंत पाटील, सहयोगी संशोधन संचालक, वि. कृ. स. कें. इगतपुरी, श्री अविनाश गायकवाड, मत्स्य विभाग, धुळे, डॉ. खुशल बर्हाटे, बाजरी पैदासकार, कृ.म.वि, धुळे, डॉ. दहाड, प्रमुख शास्त्रज्ञ, कापूस पैदासकार,तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव, श्री. नवनाथ कोळपकर, प्रकल्प संचालक, आत्मा,धुळे, डॉ. भगवान देशमुख, सहाय्यक प्राध्यापक, विस्तार शिक्षण, म.फु.कृ.वि., राहुरी, श्रीमती. कावेरी राजपूत, कृषी विकास अधिकारी, जी. प. धुळे, श्री अभिजीत रांजणकर, व्यवस्थापक, नाबार्ड धुळे, सर्व प्राध्यापक कृषी महाविद्यालय, धुळे आदी मान्यवर बैठकीस उपस्थित होते. तसेच शेतकरी प्रतिनिधी श्री. हितेंद्र गिरासे, उपाध्यक्ष, शेतकरी शास्त्रज्ञ मंच, श्री. नरेंद्र पाटील, श्री.जयेश पाटील, श्री. महेंद्र परदेशी, श्री. विनोद पाटील, श्री. आबा मोरे, महिला प्रतिनिधी श्रीमती.भारती माळी, श्रीमती.रेणुका चव्हाण आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांनी कृषी विज्ञान केंद्राचा २०२३ चा वार्षिक प्रगती अहवाल सादरीकरणाच्या स्वरूपात सादर केला. याशिवाय, त्यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत २०२४ मध्ये राबविण्यात येणाऱ्या कामाच्या कृती आराखड्याची माहिती उपस्थितांना अवगत करून दिली.

उपाअध्यक्षीय मार्गदर्शना मध्ये डॉ. सी.एस. पाटील म्हणाले की, सद्य परिस्थितीमध्ये जमिनीचा सेंद्रिय कर्ब अत्यंत खालवला असून त्यामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्राने सेंद्रिय कर्बा वाढविणेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. रासायनिक कीटकनाशके, रासायनिक खते, पाणी इ. घटकांचा अतिवापर व एक पीक पद्धती इत्यादी सर्व घटकांमुळे जमिनीवर विपरीत परिणाम होत आहे. त्या दृष्टिकोनातून सेंद्रिय कर्ब वाढवून जमिनीची सुपीकता वाढविणे हे एक मोठे आव्हान आहे. कधी काळी धुळे जिल्हा हा देशी जनावरांसाठी सर्वत्र परिचित होता. परंतु घटलेली देशी जनावरांची संख्या त्यामुळे दूध उत्पादनामध्ये मोठी घट झालेली आहे. देशी जनावरांचे संवर्धन व पालन यासंदर्भात कृषी विज्ञान केंद्र धुळे व पशुसंवर्धन विभाग धुळे यांनी हातात हात घालून सोबत काम करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी शेती व्यतिरिक्त शेती पूरक उद्योग याची कास धरणे आवश्यक आहे त्याकरिता शेळीपालन, मक्षिका पालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मत्स्य पालन इत्यादी उभारणे करणे कमी कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांना प्रशिक्षणे देणे गरजेचे आहे. कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसोबत त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यामध्ये मोलाची भूमिका बजावत आहे. मधुमक्षिका पालनाने नैसर्गिक रित्या दुर्मिळ व वनस्पती प्रजातींचे संवर्धन होत आहे. मधुमक्षिका पिकांच्या परागीभवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. शेतकरी बांधवांनी पर्यावरण पूरक जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींचा वापर वाढवून रासायनिक कीटकनाशकांचे प्रमाण कमी करण्याचे आव्हान मा. डॉ. सी. एस. पाटील यांनी याप्रसंगी केले. कृषी विज्ञान केंद्राने धुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रात तांत्रिकदृष्ट्या व्याख्याने, प्रशिक्षणे, मेळावे, प्रात्यक्षिके इत्यादींच्या माध्यमातून विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार केल्याने कृषी विज्ञान केंद्र धुळे चे विशेष अभिनंदन केले.

प्रमुख मार्गदर्शना मध्ये डॉ.बी. एम. इल्हे यांनी आधुनिक शेती युगामध्ये कमी श्रमात अधिक उत्पादन मिळविण्याकरिता शेतकरी बांधवांनी विद्यापीठाने विकसित केलेले वाण व विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. शेतकऱ्यांनी बाजाराभिमुख पिकांचा अभ्यास करून त्यांची लागवड करावी. शेती हा पारंपारिक व्यवसाय न करता शेती हा व्यवसाय समजून शेतीचा नफातोटा, ताळबंद पत्रक ठेवणे आवश्यक आहे. पर्यावरण पूरक शेती सोबतच एकात्मिक पीक पद्धतीचा वापर केल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात दुप्पट वाढ होईल असे प्रतिपादन त्यांनी केले.

तसेच बैठकी दरम्यान “श्री अन्न नाचणी” या घडीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी श्री. महेंद्र परदेशी रा. कुसुंबा ता. जि. धुळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शास्त्रज्ञ श्री. जगदीश काथेपुरी यांनी कृषिविद्या, शास्त्रज्ञ श्री. रोहित कडू यांनी उद्यानविद्या, शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील यांनी पिक संरक्षण, शास्त्रज्ञ श्रीम. अम्रिता राऊत यांनी कृषि प्रक्रिया, शास्त्रज्ञ डॉ. अतिश पाटील यांनी मृद शास्त्र आणि कृषि रसायन, शास्त्रज्ञ डॉ. धनराज चौधरी यांनी पशु शास्त्र आणि दुग्ध शास्त्र, श्री. जयराम गावित यांनी प्रक्षेत्र व्यवस्थापन आणि श्रीम. स्वप्नाली कौटे यांनी संगणक या विषयाचे २०२३ मध्ये केलेल्या कामाचा अहवालाचे सादरीकरण केले.

त्यानंतर महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि पदवीधर आयडॉल श्री. जयेश पाटील रा. पिंप्री ता. जि. धुळे यांच्या पशु फार्म वर सर्व मान्यवरानी भेट देऊन त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचे कौतुक केले.

सदर बैठकीचे संचालन श्री. जगदीश काथेपुरी, व आभार श्रीम. अम्रिता राऊत यांनी केले.या बैठकीच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य केले.






**शास्त्रज्ञ सल्लागार समिती बैठककी चे सदस्य**